# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३०.०१.२०२६

जिल्हा : सांगली

| मागील आठवड्यातील हवामान (२४.०१.२०२६ ते ३०.०१.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (३१.०१.२०२६ ते ०४.०२.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३२ | ३२ | ३२ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १९ | १९ | १९ | २० | २१ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ३ | २ | ० | १ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६९ | ६२ | ६२ | ६१ | ६० |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३९ | ३७ | ३६ | ३६ | ३४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १० | ११ | ९ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | आ. | द.आ. | आ. | आ. | आ. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये ३१ जानेवारी आणि ४ फेब्रुवारी रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तसेच १, २ आणि ३ फेब्रुवारी रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये ४ फेब्रुवारी पर्यंत कमाल तापमानामध्ये २.० ते ३.० अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असून कमाल तापमान ३१.० ते ३३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमानामध्ये २.० अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असून किमान तापमान १९.० ते २१.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६० ते ६९% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ३४ ते ३९% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०७ ते ११ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० फेब्रुवारी २०२६ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये जमिनीतून बाष्पिभवन कमी होऊन जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ वेलवर्गीय भाजीपाला पिकांना आधार देण्यासाठी मंडप (दुधी भोपळा) व इतर पिकांसाठी ताटी पध्दतीचा वापर करावा. |
| संदेश | | ➢ उस: फेब्रुवारीमध्ये बाष्पीभवनचा वेग ५.५ मिलीमीटर प्रती दिवस येवढा येत आहे त्यामुळे ऊस पिकास दररोज ३.२७ लिटर पाण्याची आवश्यकता असते ती पूर्ण करण्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ४९ मिनिटे चालवावा. |
| गहू | फुलोरा ते चिक भरणे | ➢ मागील आठवड्यामध्ये हवेतील आद्रता वाढलेली असल्यामुळे गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. तांबेरा रोगाची लागण दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्लू.पी. ३० ग्रॅम १० लिटर पाण्यातून किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + टायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु.जी. १० ग्रॅम / १० लिटर पाणी या संयुक्त बुरशीनाशकांची फवारणी करावी. |
| भुईमुग | पेरणी | ➢ संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यासच उन्हाळी भुईमुग पेरणी १५ फेब्रुवारी पर्यंत करावी<br>➢ पेरणीपुर्वी २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक प्रती किलो बियाणास वापरून बीजप्रकिया करावी.<br>➢ बुरशीनाशकाचे प्रक्रियेनंतर १ किलो बियाणांस २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम स्फुरद विरघळणाऱ्या जीवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी भुईमूग पिकास हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. स्फुरद खताची मात्रा शक्यतो सिंगल सुपर फॉस्फेटच्या माध्यमातून दयावी. यासोबत पिकास हेक्टरी १२५ किलो जिप्समचा पहिला हप्ता द्यावा.<br>➢ जस्त व बोरॉन या सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असलेल्या जमिनीत दोन वर्षातुन एकदा हेक्टरी २५ किलो झिंक सल्फेट व ५ किलो बोरॅक्स, सेंद्रिय खतांसोबत जमिनीतुन पेरणीपुर्वी द्यावे. |
| ऊस | सुरु ऊस लागवड | ➢ सुरु ऊस लागणीसाठी पूर्व मशागतीची कामे पूर्ण करून दोन डोळा टिपरीने ऊसाची लागण १५ फेब्रुवारी पर्यंत करावी.<br>➢ उसाची लागण सलग पध्दतीने करताना दोन सऱ्यामधील अंतर मध्यम जमिनीत १ मीटर व भारी जमिनीत १.२० मीटर ठेवावे.<br>➢ तसेच जोड ओळ पध्दतीने लागण करावयाची असल्यास मध्यम जमिनीत २.५-५ फूट व भारी जमिनीत ३-६ फूट अंतर ठेवावे.<br>➢ लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व<br>➢ नंतर ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| द्राक्ष | मन्यांची वाढ | ➢ द्राक्ष उत्पादक भागांमध्ये काळया रंगाच्या मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. मावा किडीच्या रसशोषणामुळे घड व फांद्यांवर चिकट मधरस साचलेला दिसून येत आहे.<br>➢ मावा किडीचा प्रादुर्भाव जास्त असल्यास इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. @ ०.४ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी प्रभावी ठरते. मात्र, येत्या पुढील एक महिनाभर माव्याचा प्रादुर्भाव सुरू राहण्याची शक्यता असल्याने वारंवार कीटकनाशकांचा वापर टाळावा.<br>➢ प्रति एकर पिवळे चिकट सापळे लावावेत, ज्यामुळे माव्यांची संख्या कमी करता येते.<br>➢ मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी लेकानिसिलियम लेकानी, ब्यूव्हेरिया बेसियाना आणि मेटारिझियम अनिसोप्लिया ही जैविक |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | कीटकनाशके प्रभावी ठरतात |
| वांगी | लागवड | ➢ उन्हाळी हंगामातील वांगी लागवड फेब्रुवारी मध्ये सुरू करावी<br>➢ सुधारित वाण: मांजरी गोटा, फुले हरित, कृष्णा (संकरीत), फुले अर्जुन (संकरीत)<br>➢ लागवडीचे अंतर: उन्हाळी : ७५x७५ सेंमी, संकरीत : १२० x ९० सेंमी<br>➢ खते: लागवडीच्या वेळी प्रती हेक्टरी ७५ किलो नत्र (३ गोणी २८ किलो युरिया), ७५ किलो स्फुरद ( ९ गोणी १८ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ७५ किलो पालाश ( २ गोणी २९ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. |
| आंबा | मोहोर | ➢ पश्चिम महाराष्ट्रात केशर आंब्यामध्ये उभयलिंगी फुलांचे प्रमाण, फलधारणा आणि उत्पादन वाढविण्यासाठी १% पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेटची (१०० ग्रॅम/१० लिटर पाण्यात) मोहोर फुटण्याच्या वेळी आणि त्यानंतर एक महिन्यानी १% पोटॅशियम नायट्रेटची (१०० ग्रॅम / १० लिटर पाण्यात) फवारणी करावी. (भा.कृ.अनु.प.) |
| आले | पक्वता | ➢ बाजारातील मागणीप्रमाणे पक्व आल्याची काढणी करावी. काढणीनंतर आल्याचे कंद स्वच्छ धुवून मातीपासून वेगळे करावे आणि बाजारात पाठवावे. |
| हळद | पक्वता | ➢ पिकाची काढणी जातीपरत्वे पिकाचा कालावधी पुर्ण झाल्यावर करावी. काढणीपूर्वी जमिनीच्या प्रतिनुसार १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे. सरीवरंबा पध्दतीवर कुदळीने खोदून काढणी करावी तर गादीवाफे पध्दतीवर मशिनच्या सहाय्याने काढणी करावी |
| पशुधन | वाढीची | ➢ उन्हाळी हंगामासाठी ज्वारी, मका, चवळी, आणि संकरीत नेपियर गवत या चारा पिकांची लागवड करावी<br>➢ उन्हाच्या तीव्रतेपासून बचावासाठी जनावरे सावलीमध्ये बांधावीत. जनावरांना शुद्ध, स्वच्छ आणि थंड पाणी पिण्यास द्यावे. |

| | |
|---|---|
| मेघदूत<br>अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी<br>अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ३०.०१.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर